बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१५५ रविवार,दि.०९ फेब्रुवारी २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-155 Sunday, Dt.09 February 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.




# सत्ता जनसेवेसाठी अर्पण करणाऱ्या ‘आप’ला जनतेची गंगाजळी !



## २७ वर्षानंतर दिल्लीवर भाजपाच्या मोदी शहांचे राज्य !!

बीड /प्रतिनिधी

मागील दहा वर्षापासून आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी आपली सत्ता जनसेवेसाठी समर्पित केलेली होती. सामान्य मतदारांच्या मनात केजरीवाल असताना देखील मतपेटीतून भारतीय जनता पार्टीला ४८ जागेवर यश मिळाल्याने स्पष्ट बहुमत मिळाले आहे. आम आदमी पार्टीला केवळ २२ जागेवर समाधान मानावे लागले आहे. दस्तूर खुद्द अरविंद केजरीवाल यांच्यासह त्यांच्या पक्षाचे विद्यमान मुख्यमंत्री यांचा देखील आश्चर्यकारक पराभव झाला आहे. त्यामुळे आता आपला जनतेने की ईव्हीएम मशीन ने गंगाजली दिली आहे. यावर दिल्लीत मंथन होत असून या निर्णयानंतर तब्बल २७ वर्षाने दिल्लीवर भाजपाच्या मोदी आणि शहांचे राज्य आले आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

नवी दिल्ली, दि. ८ फेब्रुवारी : दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी जाहीर झाला. दुपारी २ पर्यंतच्या आकडेवारीनुसार भाजपला बहुमत मिळाले आहे. आपचे संयोजक अरविंद केजरीवाल नवी दिल्ली मतदारसंघातून निवडणूक हरले आहेत. मनीष सिसोदिया यांनीही जंगपुरा येथून पराभव स्वीकारला आहे. भाजप ४८ तर आम आदमी पक्ष २२ जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेस सलग तिसऱ्यांदा शून्यावर आल्याचे दिसते. १९९३ मध्ये भाजपने पहिल्यांदा दिल्ली निवडणूक जिंकली होती. २७ वर्षानंतर भाजपला दिल्लीचे तख्त पालटण्यात यश आले.

नवी दिल्लीतून निवडणूक जिंकलेले भाजप नेते प्रवेश वर्मा यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. त्यांनी लिहिले की, अंधार दूर झाला आहे, सूर्य उगवला आहे, कमळ फुलले आहे. दिल्लीने विकास निवडला आहे. हा विजय दिल्लीच्या विश्वासाचा आहे, हा विजय दिल्लीच्या भविष्याचा आहे. भारतीय जनता पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या कठोर परिश्रमाबद्दल आणि दिल्लीतील जनतेच्या विश्वासाबद्दल आभारी आहे. दिल्लीच्या या नवीन पहाट साठी सर्व दिल्लीवासीयांचे अभिनंदन.

मालवीय नगर मतदारसंघातील आपचे उमेदवार सोमनाथ भारती यांचाही पराभव झाला आहे.आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांचा नवी दिल्ली मतदारसंघातून पराभव झाला आहे. भाजपचे प्रवेश वर्मा येथे विजयी झाले आहेत. केजरीवाल यांची ही चौथी निवडणूक होती आणि ते पहिल्यांदाच निवडणूक हरले आहेत. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला आहे.

कोंडली मतदारसंघातून आपचे कुलदीप कुमार विजयी झाले आहेत. आप नेते मनीष सिसोदिया यांनी जंगपुरा मतदारसंघातून पराभव स्वीकारला आहे. ते म्हणाले, जंगपुराने प्रेम, आपुलकी आणि समानता दिली. त्यांचा सुमारे ६०० मतांनी पराभव झाला. तर अजित पवारांच्या



राष्ट्रवादीला एक ही जागा जिंकता आली नाही. त्यांच्या उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.

आतिशी विजयी

आपचे दिग्गज नेते पराभूत झाले असताना विद्यमान मुख्यमंत्री आतिशी यांच्या विजयामुळे पक्षाची लाज राखली गेली आहे.



## काँग्रेसला ‘एक भी नहीं’

### सक्षम विरोधी पक्ष म्हणून भूमिका पार पाडू : केजरीवाल

जनतेने जो निर्णय दिला आहे त्याचा आम्ही नम्रतेने स्विकार करतो. या विजयासाठी भारतीय जनता पार्टीला शुभेच्छा. आशा आहे की नागरिकांनी ज्या अपेक्षेने त्यांना बहुमत दिले आहे, त्या सर्व अपेक्षा ते पूर्ण करतील. मागील १० वर्ष जनतेने आम्हाला जी संधी दिली, त्या १० वर्षात आम्ही अनेक कामे केली. शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज अशा विविध क्षेत्रांमध्ये नागरिकांसाठी काम केले. दिल्लीतील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याचे काम देखील केले. जनतेने जो निर्णय दिला आहे, त्याद्वारे आम्ही एक सक्षम विरोधी पक्ष म्हणून भूमिका पार पाडू. तसेच, समाजसेवा, लोकांची मदत करणे असो आम्ही नेहमी त्यांची मदत करत राहू,, असे पराभवावर बोलताना ते म्हणाले.








## उत्कृष्ट अभिनयपटू कन्हैया जाधव याचे पीएम पाली शाळेच्या वतीने जाहीर सत्कार संपन्न

पाली प्रतिनिधी

२१ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेमध्ये पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली मधून सावली ह्या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेमध्ये कन्हैया जाधव हा उत्कृष्ट अभिनयासाठी पात्र ठरला.त्याबद्दल त्याचे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.लाड सर, दिग्दर्शक श्रीमती मुंडे मॅडम,खाडे मॅडम,सवई मॅडम, राठोड सर,काब्दे मॅडम, आघव सर, तळेकर सर,म्हेत्रे मॅडम, पायकेसर, मुळे मॅडम,जगताप मॅडम,जाधव मॅडम, सुमय्या मॅडम यांनी सर्व सावली टीमचे व कन्हैया जाधवचे अभिनंदन प्रशाले च्या वतीने करण्यात आले.

या कलाकारांनी भविष्यातही घवघवीत यश संपादन करण्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.त्याप्रसंगी कन्हैयाची आजी व त्याचे वडील उपस्थित होते. त्यांचेही प्रशालेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

## ट्रस्टचे नाव पुढे करत ग्रामपंचायतची ओपन स्पेसची जागा हडप करण्याचा प्रयत्न

### माजी सरपंच बालासाहेब बादाडे,विक्रम राऊत व इतर सदस्य सहभागी

प्रतिनिधी । माजलगांव

तालुक्यातील भाटवडगाव येथील सर्वे नंबर ७३ मधील पुनर्वसन झालेले काडीवडगांव क्र.२ येथील सर्व्हे नंबर ७३ मधील भूखंड क्र.१०३ रद्द करण्यात यावे अर्जदार भिसे राजाभाऊ मरीबा रा.काडीवडगांव क्र.२ ता.वडवणी जि.बीड यांचे पत्र दि.१४ जानेवारी २०२५ दिले.त्यास उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविले की,काडीवडगांव क्र.२ येथे ओपन स्पेस ची सहन जागा आहे.त्या जागेवर माजी सरपंच बालासाहेब तुकाराम राऊत व विक्रम अच्युत राऊत या दोघांनी व गावातील ७ जण यांनी ट्रस्टतर्फे सभासद आहेत.यांनी मिळून ग्रामपंचायत काडीवडगांव ची सहन ओपन स्पेस जागा हडप करण्याचे उद्देशाने मारोती मंदीर ट्रस्ट केले आहे.या ट्रस्ट मधील अध्यक्ष उपाध्यक्ष यांनी स.नं.७४ मधील ओपन स्पेस जागेवर सरपंच असतांना बोगस प्लॉट काढून विक्री केलेली आहे. तसेच सर्व्हे नं.७३ मधील ओपन स्पेस जागा शासनाने राखून ठेवली जागा हडप करण्याच्या हेतूने मारोती मंदीर ट्रस्ट केले आहे. तसेच हे लोक ट्रस्टवरचे सभासद हे गावात राहत नसून यांचा धंदा सहन जागा हडप करण्याचा आहे.म्हणून यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.हडप केलेली जागा ज्याची लांबी पु.प.२००फुट व रुंदी द.उ.१६०फुट असुन ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३२०००चौ.फुट आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बालाजी तोंडे, शेख रिजवान

### तर जिल्हा कार्याध्यक्षपदी सोमनाथ धांडे यांची निवड





प्रतिनिधी । बीड

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बालाजी तोंडे, शेख रिजवान तर कार्याध्यक्षपदी सोमनाथ धांडे यांच्या निवड करण्यात आली. असल्याची घोषणा राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी केली आहे.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची बीड जिल्हा कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, यांच्या मान्यतेने राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी घोषित केली असुन जिल्हा कार्यकारिणीमध्ये जिल्हा उपाध्यक्षपदी दत्ता आजबे, आप्पासाहेब महानोर, प्रशांत लहुरीकर सचिवपदी राहुल गायकवाड, सहसचिव नितीन मुंडे, सदस्यपदी गणेश जाधव, उदय नागरगोजे, रामेश्वर जाधव, बंडु दुबाले, मनोज गव्हाणे, निलेश येलगिरे, बाळासाहेब वरकड, निलेश वाघमोडे यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई ही पत्रकारांच्या विविध

(उर्वरीत पान २ वर)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ
सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय

# माफियांचे कुटिलोद्योग

उद्योजकांना त्रास दिला तर संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार (मकोका) कारवाई करू, असा सज्जड दम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. गृहखात्याचा कारभार सांभाळणारे फडणवीस यांनीच या प्रश्नाला तोंड फोडले, हे बरे झाले; अन्यथा वेगवेगळे माफिया, गावगुंड आणि खंडणीखोरांमुळे हैराण उद्योजकांना व्यवसाय करणेही अशक्यप्राय झाल्याचे गेल्या काही दिवसांतील घटनांमधून दिसते. एकीकडे या माफियांचा जाच आणि त्याला विविध राजकीय 'आकां'चा आशीर्वाद यांमुळे ठिकठिकाणच्या उद्योजकांची अवस्था 'सांगता येत नाही आणि सहनही होत नाही,' अशी झालेली आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीलाच नख लावणारे हे दुष्टचक्र मोडून काढण्याचे आव्हान स्वीकारायलाच हवे.

आर्थिक प्रगतीमध्ये राज्याने अजूनही आघाडी टिकवलेली असली, तरी आता विविध राज्यांची स्पर्धा निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वीच फडणवीस यांनी दावोस येथे अनेक सामंजस्य करार केले. एकीकडे सरकार उद्योगांना पायघड्या घालत असताना या मार्गातील धोंड बाजूला सारणे, ही या प्रगतीची पूर्वअट ठरते. उद्योगांची भरभराट होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारीही नि:संशयपणे सरकारचीच आहे. त्यामध्ये लालफितशाही हटविणे, उद्योगांना पुरेशी जागा, पायाभूत सुविधा, माफक दरात वीज-पाणी यांबरोबरच भयमुक्त वातावरणही महत्त्वाचे.

Daily Samarth Rajyog    Date - 09.02.2025

**CHANGE IN NAME**

I Declared By This Publication About
Change In My name
Old Name - BAGLANE KAILAS BHIMRAO
New Name - KAILASH BAGLANE
Address - KakdHira Post - Palwan,
Taluka Jilha - Beed 431122
Sampark-Kailash Baglane,KakdHira
Post-Palwan,Tq.Dist.Beed.43 11 22

दैनिक समर्थ राजयोग    दि.९ फेब्रुवारी २०२५

**नावात बदल**

मी या जाहीर प्रगटनाद्वारे जाहीर करतो की,माझे जुने नाव :- कैलास भीमराव बागलाने असे असून आता...
नवीन नाव :- कैलाश बागलाने असे सुधारित आहे.
पत्ता :- काकडहिरा, पोस्ट - पालवन, ता. जि.बीड. महाराष्ट्र ४३ ११ २२ असा आहे. याची कृपया सर्वांनी दखल घ्यावी ही विनंती.
**:: संपर्क ::**
**कैलाश बागलाने,काकडहिरा,बीड-४३११२२**

# युथ फॉर माय भारत शिबिरात स्वयंसेवकांचा स्वच्छता, श्रमदान आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव

**प्रतिनिधी । आष्टी**

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे ब्रम्हगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे सुरू असलेल्या 'युथ फॉर माय भारत' विशेष हिवाळी शिबिरात मागील चार दिवसांपासून विविध उपक्रमांद्वारे स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकीचे धडे गिरवले.

स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता आणि श्रमदान उपक्रमात सक्रिय सहभाग घेत गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा आणि मंदिरे स्वच्छ केली. स्वच्छतेबाबत गावकऱ्यांमध्ये जनजागृती करून प्लास्टिकमुक्त गाव आणि स्वच्छ परिसरासाठी विशेष प्रयत्न केले.

ग्रामीण जीवन अधिक जवळून अनुभवण्यासाठी स्वयंसेवकांनी शेती आणि शेतकऱ्यांचे दैनंदिन जीवन समजून घेतले. शेतीच्या विविध पद्धती, सिंचन समस्या, शेतीपूरक व्यवसाय आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती याबाबत थेट



संवाद साधला. शेतकऱ्यांच्या मेहनतीची आणि ग्रामीण जीवनशैलीची जाणीव त्यांना नव्या दृष्टिकोनातून झाली.

स्वयंसेवकांनी ब्रम्हगावचे आर्थिक सर्वेक्षण करून गावातील कुटुंबांचे उत्पन्न, व्यवसाय, शेती उत्पन्न, शिक्षणस्तर आणि सरकारी योजनांचा लाभ याबाबत माहिती संकलित केली. या सर्वेक्षणाद्वारे त्यांना ग्रामीण अर्थकारण आणि ग्रामविकासाच्या संधींचा प्रत्यक्ष अभ्यास करता आला. या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी गट समन्वयक डॉ. रवी सातभाई, कार्यक्रम अधिकारी डॉ. सुहास गोपणे, डॉ. महेंद्र वैरागे, प्रा. शुभांगी खुडे यांनी विशेष मेहनत घेतली. ग्रामस्थांनीही स्वयंसेवकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि अशा उपक्रमांमुळे युवकांना ग्रामीण जीवनाची जाण आणि समाजाभिमुख दृष्टिकोन मिळतो, असे मत व्यक्त केले. स्वयंसेवकांच्या या योगदानामुळे गावात सामाजिक आणि आर्थिक जाणीव निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## सागर धस भेटीला.कारेगाव येथील युवक बिबट्याच्या हल्लात जखमी

**प्रतिनिधी । पाटोदा**

तालुक्यातील कारेगाव येथील भोसले वस्तीवरील युवकावर बिबट्याने हल्ला केला असता तो जखमी झाला ही माहिती आ.सुरेश धस यांना समजताच. तात्काळ युवा नेतृत्व सागर धस यांनी बीड येथील. रुग्णालयात जावुन गोवर्धन येवले यांची भेट घेऊन विचारपूस केली. याबाबत अधिक माहिती अशी की तालुक्यातील भोसले वस्ती कारेगाव येथील गोवर्धन येवले या युवकावर बिबट्याने दि. रोजी हल्ला केल्याची माहिती मिळाली.असता गोवर्धनवर बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यावेळी सागर धस यांनी गोवर्धन येवले याची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली

# चाईल्ड प्रायमरी स्कूल केज येथे खो-खो महिला विश्वकप विजेत्या भारतीय संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे यांचा भव्य सत्कार




**प्रतिनिधी । केज**

खो-खो महिला विश्वकप विजेत्या भारतीयसंघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे चे केज येथील चाईल्ड प्रायमरी स्कूल,केज येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले.याबाबत सविस्तर माहीती अशी की,केज परिसरा तील कळमआंबा येथील कु.प्रियंका इंगळे हिच्या नेतृत्वाखालीलमहिलांच्या भारतीय खो-खो संघाने, दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर पारपडलेल्या विश्वकप स्पर्धेत अंतिम सामन्यात नेपाळ संघावर मात करत विश्वकप जिंकला.त्यामुळे या आपल्या भागातील कळमआंबा येथील प्रियंका इंगळे या लेकीचा स्वराज्य संस्था संचलित चाईल्ड प्रायमरी स्कूल केज व ग्रामस्थांच्या वतीने दि.०८ फेब्रुवारी २०२५ रोजी शनिवारी सकाळी १०-०० वाजता भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.हनुमंत सौदागर हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नागेशजी कराळे, प्रियांकाचे आई वडिल आजोबा व काका,तसेच पत्रकार रंजीत घाडगे, शेखर पाटील,प्रकाश काळे,सचिन बचुटे,प्रदिप गायकवाड,गणेश तपसे, हरिश्चंद्र पांचाळ,शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष श्री.शरदजी गिराम सर यांनी केले होते.सत्काराचे स्वरुप पुष्पहार,पुष्पगुच्छ, शाल,श्रीफळ व ट्रॉफी मिळालेली प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सर्व कर्मचारी,पत्रकार,ग्रामस्थ व इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रकाश काळे यांनी केले तर आभार शरद गिराम यांनी व्यक्त केले.



## जि.प. माध्यमिक हिंगणी बु. शाळेचे एन एम एम एस परीक्षेत घवघवीत यश

**प्रतिनिधी । धारूर**

सन २०२५ मध्ये झालेल्या एन एम एम एस परीक्षेत चा निकाल नुकताच जाहीर झालाअसून त्यामध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा हिंगणी बुद्रुक शाळेतील इयत्ता आठवी मधील विद्यार्थिनी कु.शेंडगे अमृता शिवराम व कु.मोरे अमृता बलभीम या विद्यार्थिनींनी परीक्षेत घवघवीत यश संपादित केले आहे. दोघीही सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्या आहेत.

कु.शेंडगे अमृता शिवराम व कु.मोरे अमृता बलभीम यांच्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रंजीत रुपनर, उपाध्यक्ष सुधाकर तंबूड , सरपंच योगेश सोळंके, ऋषी सोळंके , शाळेचे मुख्याध्यापक लोंढे सर, भायमारे सर, राठोड सर, श्याम धारक सर ,गडदे सर , बरमदे सर, सातपुते सर, आदमाने सर , शेख सर टाकळे सर, विशाल सोळंके, सर कदम,पवार मॅडम, शिंदे मॅडम व सोळंके आप्पा यांच्यासह गावकरी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.




# बचपन बालविद्या मंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

## चिमुकल्यांनी धरला गाण्यावर ठेका

**प्रतिनिधी । केज**

केज शहरातील धारूर रोडलगतच्या बचपन बाल विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन मुक्ताई लॉन्स मध्ये दि.८ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी झाले.कार्यक्रमाचे उदघाटक नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड,प्रमुख उपस्थिती पत्रकार रामदास तपसे,डा.अशोक चाटे,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,डॉ.हनुमंत सौदागर,संजय राख, बचपन बाल विद्यामंदिर चे विनायक कराड यांच्या हस्ते उदघाटन झाले.यावेळी हनुमंत भोसले म्हणाले की,पालकांनी विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करावे.केजचा सांस्कृतिक वारसा जपावा असे आवाहन केले.सौ. सीताताई बनसोड म्हणाल्या की,शिक्षणा बरोबरच विद्यार्थ्यांवर संस्कार होणे आवश्यक आहे.मुलांच्या आहारावर मातांनी लक्ष दिले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ,कला,संगीत हे महत्त्वाचेआहे.सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थी घडतो असेमत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.

यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध गीत सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.माऊली माऊली यांसह मराठी, हिंदी गीत,लावणी नृत्य सादर केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षिका वैशाली कराड,ज्ञानेश्वरी सत्वधर,रुपाली बोबडे व त्यांच्या टीम ने परिश्रम घेतले सूत्रसंचालन रुपाली बोबडे,अजलान तांबोळी यांनीकेले.कार्यक्रमास नागरिक,पालक,मोठया संख्येने उपस्थित होते.

# एन एम एम एस परीक्षेत रामराव पाटील शाळेचे घवघवीत यश

**प्रतिनिधी । केज**

केज येथील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयातीलविद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थी (एन.एम.एम.एस) या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.शाळेकडून उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री. गोरे सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर,केंद्र प्रमुख श्री.अंकुशे सर उपस्थित होते.
उपस्थितांच्या हस्ते विद्यार्थी व पालकांचा संयुक्त सत्कार करण्यात आला.रामराव पाटील माध्यमिक शाळेमध्ये दरवर्षी एन एम एस परीक्षेमध्ये विद्यार्थी प्रविष्ट केले जातात.यावर्षी ३० विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १५ विद्यार्थी एन.एम.एम. एस.परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.यानिमित्त उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व त्या सोबत त्यांच्या पालकांचा सत्कार शाळेमध्ये आयोजित केलेला होता.यावेळी बोलताना डॉ.हनुमंत सौदागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व ग्रामीण भागातील विद्यार्थी असे यश संपादन करूशकतात यासाठी पालकांनी शाळे सोबत एकत्र येऊन दिशादर्शन करावे असे सुचवले.तसेच पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.तसेच शाळेचे



मुख्याध्यापक श्री.गोरे सर यांनीविद्यार्थ्यांचेअभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी सर्व पालक व विद्यार्थी उपस्थित होते यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे अध्यापक सतीश कळेकर,शेख इर्शाद,श्री. देवकते,श्री.पोटभरे यांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती डॉ.गिरी मडम यांनी केले तर आभार सुधीर नाईकनवरे यांनी मानले.कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी,पालक सर्वशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून...

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ...**

प्रश्नांसाठी लढणारी, त्यांना त्यांचे हक्क मिळवून देणारी संघटना आहे. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी वाचा फोडण्यासाठी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दीक्षाभूमी ते मंत्रालयात पत्रकार संवाद यात्रा काढून पत्रकारांचे प्रश्न प्रभावपणे सरकार दरबारी मांडले त्यातून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र दोन महामंडळाचे सरकारने घोषणा केली. संघटनेने सामाजिक आणि समाजाभिमुख उपक्रमामध्ये सातत्याने मोठे योगदान दिले आहे. नव्याने नियुक्त केलेल्या बीड जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी देखील पत्रकारांच्या प्रश्नाबाबत सजग राहून सामाजिक उपक्रमांना बळ देतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केला आहे.तर राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी नवीन पदाधिकार्यांना शुभेच्छा देत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई ही केवळ संघटना नाही तर पत्रकारांच्या न्याय हक्काची चळवळ आहे. लहान-मोठ्या उपक्रमाच्या माध्यमातून पत्रकार संघ सातत्याने चांगले उपक्रम राबवत राहील असे सांगितले. प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी नवनियुक्त पदाधिकार्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# बीडमध्ये आ.संदीप क्षीरसागरांकडून बंधारा कम पुल जागेची पाहणी तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ

## शाहूनगर येथील रस्ता कामासह विविध ठिकाणच्या विकास कामांची केली पाहणी

**प्रतिनिधी । बीड**

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदार संघातील विकास कामांचा समतोल कायम ठेवला आहे मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात सुरू झालेली विकासकामे गतीने पुढे सरकावीत यासाठी स्वतः उभा राहून आमदार संदीप भैया लक्ष देत आहेत. शनिवारी (दि.८) सकाळी बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत असलेल्या जागेची त्यांनी पाहणी केली. तसेच तेलगाव नाका येथे पाण्याच्या नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला.

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत आहे.या जागेची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी करण्यात आली. लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात देखील होणार आहे. काम सुरू होण्यासाठी आवश्यक असलेल्या तपासणी व चाचण्या घेण्याचे काम सुरू आहे अशी माहिती यावेळी त्यांनी दिली.

बीड शहरातील तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी परिसरात सूरु असलेल्या रस्ता कामांची पाहणी केली. याबरोबरच बीड शहरातील प्रभाग क्र.२२ मधील कै.शिवाजी धांडे नगर भागातील मुख्य नाल्याची पाहणी करून नाल्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबत आ.संदीप भैय्यानी संबंधित यंत्रणेस निर्देश दिले. तसेच या परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी देखील केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला.

सध्या बीड शहरातील शाहूनगरमधील आदर्श नगर भागात सिमेंट रस्ता कामासह विकासकामांची पाहणी केली. यावेळी उपस्थित



नागरिकांशी विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी चर्चा केली. बीड शहरासह मतदारसंघातील विकास कामांचा वेग यापुढेही असाच कायम ठेवला जाईल अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.

# अपयश तात्पुरते असते, त्याला घाबरू नका - विश्वास पाठकांचा युवकांना सल्ला

## महाविद्यालयीन जीवनात सुसंगत अत्यंत महत्वाची - नवनाथ बन

**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

संघ विचार परिवाराच्या कुळातून शैक्षणिक क्षेत्रात काम करणार्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या यशाची उज्ज्वल परंपरा असून संस्थेची शतकाकडे वाटचाल खुप मोठा टप्पा म्हणावा लागेल. त्यासाठी त्याग, तपश्चर्या तितकीच महत्वाची असुन ज्या संस्थेने स्व.प्रमोदजी महाजन, स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे कार्यकर्तृत्व घडविले, तिथे येण्याचे भाग्य मला मिळाले हे माझे नशीब. परिस्थिती कशीही आली तरी प्रामाणिकपणे काम केले तर निश्चित यश मिळते, अपयशाला घाबरू नका कारण ते तात्पुरते असते असा मौलिक युवकांना सल्ला महावितरण स्वतंत्र संचालक तथा भाजपाचे सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी दिला. दरम्यान महाविद्यालयीन जीवनात सुसंगत कुणाची ? यावर आपले करिअर घडते. राष्ट्र विचाराने प्रेरित असलेल्या संस्थेतून व्यक्तीमत्व



विकास झाल्याशिवाय रहात नाही. माझ्या जीवनात या संस्थेचे अत्यंत महत्वाचे स्थान असल्याचे प्रतिपादन भाजपा माध्यम विभागाचे प्रदेश प्रमुख नवनाथ बन यांनी केले.

या कार्यक्रमास केज विधानसभेच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार मुंदडा यांनी स्नेह संमेलन हा विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा दिवस असून विविध स्पर्धेच्या माध्यमातून व्यक्तीमत्वाचा विकास होतो. भारतीय शिक्षण प्रसारक ही संस्था माझी असल्याने आपलेपणाचे नातं वेगळंच असल्याचे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर होते. संस्थेच्या येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर बोलत होते. व्यासपीठावर संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, डॉ.कल्पनाताई चौसाळकर, किरण दादा कोदरकर, अविनाश तळणीकर, वर्षाताई मुंडे, आप्पाराव यादव, ऍड.शरद इंगळे, खो-खो आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रथम आलेल्या कु.प्रियंका इंगळे यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या शुभ हस्ते दिप प्रज्ज्वलन झाल्यानंतर उपस्थित अतिथींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातुन महाविद्यालयाची ओळख प्राचार्या डॉ.प्रिती पोहेकर यांनी करून दिली. संस्थेच्या वतीने कु.इंगळे हिचा सन्मान करण्यात आला.आपल्या भाषणात विश्वास पाठकांनी संस्थेच्या यशाचे कौतुक करताना कोणतीही संस्था तपश्चर्यानेच प्रगतीच्या दिशेने चालते. २०४७ पर्यंत भारत हा विश्वगुरू होईल. त्यासाठी अशा संस्थेची अत्यंत भुमिका महत्वाची वाटते. कारण, एक चांगला भारतीय नागरिक माध्यमांतुन घडविल्या जातो. जीवनात एखादी संधी मिळाली तर आपल्याच कामातुन त्या संधीचा आनंद घेता येतो.

# क्रीडा महोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू घडतील - आ. विजयसिंह पंडित

## दिमाखदार सोहळ्यात खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण



**प्रतिनिधी** । गेवराई

पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीने घेतलेल्या जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या क्रीडामहोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू तयार होतील. पुढील काळात या क्रीडा महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यासाठी तालुक्यातील इतर शाळांच्या विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतले जावे. कोणत्याही क्षेत्रात ध्येय गाठायचे असेल तर सराव आणि सातत्य महत्वाचे आहे. वर्षभर खेळाचा सराव आणि स्पर्धेमध्ये सातत्य ठेवल्यामुळे गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागामधील खेळाडू या महोत्सवात घडत आहेत ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. विजयाच्या उन्मादाने वागायचे नाही आणि पराभवाने खचून जायचे नाही ही भूमिका ठेवून विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात नाव कमवावे असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण करताना ते बोलत होते.शारदा स्पोर्ट्स कडमीच अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन शारदा विद्या मंदिर गेवराई येथे करण्यात आले होते. यावेळी आ.विजयसिंह पंडित, सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले, नगरसेवक शाम येवले, युवानेते पृथ्वीराज पंडित, डॉ.अशोक काळे, दत्ताभाऊ पिसाळ, नवीद माशायक, दीपक आतकरे, खाजा मामू, विष्णुपंत घोंगडे, संतोष सुतार, दिनेश घोडके, वसिम फारोकी, विजय सुतार, सरवर पठाण, संदीप मडके, दत्ता दाभाडे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# द्वारका कांबळे यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

## जागतिक महिला दिनी होणार मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान

**प्रतिनिधी** । बीड

उपेक्षित शोषित वंचित पीडित समाजाला न्याय देण्यासाठी आपले उभे आयुष्य वेचणाऱ्या अंबाजोगाईतील द्वारकाबाई पिराजी कांबळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी देण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील स्त्री रत्न पुरस्काराने



मान्यवरांच्या शुभहस्ते जागतिक महिला दिनी म्हणजेच येणाऱ्या ८ मार्च २०२५ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

अंबाजोगाई येथील सामाजिक कार्यकर्त्या द्वारकाबाई पिराजी कांबळे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शेकडो महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यामध्ये अनमोल योगदान दिले आहे. एवढेच नव्हे तर पीडित शोषित विकसित महिलांना न्याय मिळावा यासाठी त्या कायम आक्रमक आणि संघर्ष करत भूमिका घेत असल्याने त्या पिडीताना न्याय मिळत गेला आहे. बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेकडो महिलांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. छोट्या मोठ्या उद्योग व्यवसायातून महिला स्वाभिमानाने जगल्या पाहिजेत यासाठी त्यांचे कार्य अतुलनीय ठरले आहे. त्यांच्या या धाडसी सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# शेतकऱ्यांच्या बाबतीत घोषणा फक्त नको आता अंमलबजावणी करा- खा.रजनीताई पाटील

**प्रतिनिधी** । केज

महाराष्ट्रातील राज्य सरकार व केंद्र सरकार केवळ आम्ही शेतकऱ्यां च्या बाजूने कसे आहोत हे दाखवण्याचा देखावा हे सरकार करत असून शेतकऱ्यांना फक्त घोषणा दिल्या जात आहेत असे परखड मत कॉंग्रेसच्या जेष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत व्यक्त केले.आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या बाबतीत अतिशयविदारक चित्र पहायलामिळत आहे सोयाबीनला प्रति क्विंटल ६ ते ७ हजार रुपये भाव देऊ म्हणून निवडणुकीत मत घेणारे हे सरकारआज ३हजार ८०० ते ४ हजारा ने सोयाबीन विकत जात असताना सरकार काय करत आहे हमीभाव कशाला बांधला ? असे सवाल त्यांनी केले तसेच १ रुपया मध्ये पीक विमा आणला ही चांगली गोष्ट मात्र तो विमाच दिलाजात नाही उलट महाराष्ट्रात ५०० कोटींचा घोटाळा या विम्यात झालाय हे भाजप चे एक आमदारच सांगत आहेत मग ही योजना सरकार मधल्या लोकांसाठी आणली गेली का ? असाही प्रश्न पडतो. महा डीबीटी सारख्या पोर्टलवरकेवळयोजनांच्या



नोंदणीचा फार्स केला जातोय याचा प्रत्यक्षात लाभ किती आणि कधी मिळणार असे एक ना अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या बाबतीत अनुत्तरित असल्याचे खा.रजनीताई पाटील म्हणाल्या.तसेच सरकार कृषी क्षेत्रात आर्टिफीशीयलइंटेलिजन्स (ए आय)चावापर करणार अशा घोषणा करणे म्हणजे एक फॅशनच झाली असल्याची टीका त्यांनी सरकारवर केली. शेतकऱ्यांच्या अशाविविध प्रश्नांवर खा.रजनीताई पाटील यांनी आवाज उठवत सरकारला चांगलेच धारेवर धरले व शेतकऱ्यांच्या मुख्य प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली त्यामुळे आता सरकार याची दखलघेऊन यामध्ये काय सुधारणा करणार हे महत्वाचे आहे.

# कन्या प्रशाला आष्टी चे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश

**प्रतिनिधी** । आष्टी

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पुणे यांचे मार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा सन २०२४ - २०२५ च्या परीक्षेमध्ये जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी च्या विद्यार्थीनींनी घवघवीत यश संपादित केले आहे. यशाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. कन्या प्रशाला आष्टी ही बीड जिल्ह्यातील एकमेव मुलींची संख्या जास्त असलेली आदर्श शाळा आहे. या शाळेत नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. आज रोजी या शाळेचा इयत्ता १ ते इयत्ता १० वी चा ८५० पट आहे. सदरील शाळेत सततच मुलींना गुणवत्तेबरोबरच स्वरक्षणाचे, संस्काराचे व सामान्य ज्ञानाचे धडे दिले जातात. त्यामुळेच पालकांना व विद्यार्थीनींना ही शाळा आपली हक्काची शाळा वाटते.



एनएमएमएस मध्ये यशस्वी विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे आहेत. फुंदे साक्षी नवनाथ, भवर नम्रता अशोक, भवर यशांजली माणिक, धनवडे सायली दादासाहेब, सोले शिवांजली दिलीप, राठोड अंकिता अंकुश, पठाण सोफिया साजिद, मुरकुटे सृष्टी दिपक, खाडे सृष्टी भीमराव, टापरे ईश्वरी भरत, सातपुते ऋतुजा दिपक.

या सर्व यशस्वी विद्यार्थीनींना देविदास शिंदे, राजेंद्र शेळके, दत्तात्रय गाडेकर, श्रीम. लतिका तरटे मॅडम, श्रीम. नाझिया बागवान मॅडम यांनी जादा तासिका घेवून मार्गदर्शन केलेले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व आदर्श शिक्षकांचे व विद्यार्थीनींच्या पालकांचे आष्टी विधानसभा मतदार संघाचे मा. आ. सुरेश आण्णा धस, आष्टी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव साहेब, विस्तार अधिकारी अर्जुन गुंड साहेब, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे साहेब, आष्टी नंबर १ केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक सुरेश पवार, शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब खताळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा श्रीमती सुजाता झगडे, उपाध्यक्षा प्रभा वायकर, शिक्षण प्रेमी नागरिक लक्ष्मण रेडेकर व डॉ. नदीम शेख, सर्व पालक, शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती सदस्या कन्या प्रशाला आष्टी यांनी अभिनंदन केले आहे.

# सहकारातील अडचणींवर चिंतन गरजेचे रांगा लावून ठेवी मागने चुकीचे- ॲड. अजित देशमुख

**प्रतिनिधी** । माजलगांव

सहकार चळवळ ही मानव विकासासाठी एकमेकांना सहकार्य करणारी चळवळ आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी सहकाराचा उगम झाला. यानंतर अनेक सहकारी संस्था आल्या. थेट ग्रामीण भागापर्यंत फक्त सहकाराची चळवळ रुजली. शेतकऱ्यांना दारात जाऊन कर्ज देणाऱ्या संस्था म्हणून सहकारी संस्थांकडे पाहिले गेले. मात्र आता सहकारातील अडचणींवर चिंतन होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सहकारी संस्थांनी देखील एकत्र येऊन चिंतन करण्याची गरज निर्माण झाल्याचे ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित देशमुख यांनी म्हटले.

माजलगाव येथील एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांसमोर सहकारी चळवळीवर बोलताना ड. देशमुख पुढे म्हणाले की, खऱ्या अर्थाने सहकारी संस्था या ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेच्या कणा समजल्या जातात. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कर्ज वितरण करणाऱ्या संस्था म्हणून विशेष कार्यकारी सहकारी संस्थांना संबोधले जाते. त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या सहकारी पतसंस्था या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या आहेत.

आता अनेक ठिकाणी थोडी चर्चा झाली की, संस्थांच्या पुढे ठेवीदारांच्या रांगा लागतात. काही ठिकाणी संस्थांचे चुकत असेल. मात्र अनेक चांगल्या संस्थांना देखील अडचणीत आणण्याचा प्रयत्न काही ठिकाणी जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसते. कोणतीच संस्था अथवा थेट राष्ट्रीयकृत बँक देखील सर्वच ठेवीदार पैसे मागण्यासाठी एकत्र आले, तर पैसे देऊ शकत नाही, हे वास्तव आहे. याकडे देखील पाहिले पाहिजे.

विना सहकार नही उद्धार, यासारखे ब्रीद वाक्य घेऊन साखर कारखाने, सूतगिरण्या, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, बहुराज्यिय पतसंस्था, त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वात आल्या. लोकशाही पद्धतीने कारभार करणाऱ्या आणि सभासदांची मालकी असणाऱ्या या संस्थांमध्ये सातत्याने कायदेशीर बंधने वाढविण्यात आली. यात जनतेचे योगदान देखील मोठे आहे, असेही ते म्हणाले.

राष्ट्रीयकृत बँका ज्या ठिकाणी मदत करत नाहीत, नियमाचा बडगा दाखवतात, त्या ठिकाणी सहकारी संस्थांनी अनेकांना उभे केले आहे. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखान्यांचे काम देखील शेतकरी पोषक ठरलेले आहे. सध्या राज्यात सहकारावर अनेक कार्यक्रम होत आहेत. सहकार दिंडी देखील महाराष्ट्रभर फिरत आहे. त्याचाच एक भाग म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून युवकांनो जग जिंका - सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

## योगेश्वरी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर



**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

युवकांनी सतत स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत स्वतःला 'ट्रान्सफॉर्ममेशन ' प्रक्रियेत ठेवले पाहिजे तरच त्यांच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून येऊन ते जीवनात आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करीत ते ध्येय मिळवू शकतात, जग जिंकू शकतात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडीकल असोसिएशनचे सांस्कृतिक राज्य प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

योगेश्वरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख व्याख्याता म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव कमलाकरराव चौसाळकर, संचालक अंगदराव कराड , प्राचार्य एम.व्ही. कानेटकर, उपप्राचार्य आर.व्ही.कुलकर्णी, प्रा.मेजर एस.पी.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी, युवा वर्गाने आपल्या व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व या दोन गोष्टींकडे विशेषत्वाने लक्ष दिले पाहिजे असे सांगून या गोष्टीं जीवनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत असे सांगितले. स्वतःमध्ये बदल करीत राहणे ही एक निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक चांगली गोष्ट आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वांमध्ये त्या गोष्टीचा समावेश करणे म्हणजेच स्वतःमध्ये ट्रान्सफॉर्मेशन करणे आहे. हे ट्रान्सफॉर्मेशन एका रात्रीत होत नसते तर त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. युवा वर्गाने आपल्या जीवनात ही प्रक्रिया सतत गतिमान केली पाहिजे. युवकांनी अंधश्रद्धा बाजूला सारून विज्ञानवाद स्वीकारला पाहिजे, दैववाद सोडून कर्मवाद स्वीकारला पाहिजे, समाजामध्ये समाज बदलेल ही अपेक्षा ठेवण्यापेक्षा प्रथम मी स्वतःला बदलेल आणि त्यानंतर माझ्या कुटुंबाला बदलेल त्यानंतर समाजाला बदलण्याचा प्रयत्न करेल असे जर ठरविले तर भारत देशाला महासत्ता बनविण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. युवकांनी आपल्याला व्यसनांपासून दूर ठेवले पाहिजे. कारण, व्यसने ही मानवी जीवनाला लागलेला शाप आहे .व्यसनांमुळे आपली, स्वतःची तसेच आपल्या कुटुंबीयांची अधोगती होते. त्यामुळे युवा वर्गाने दारू, गांजा, तंबाखू, गुटखा, मादक द्रव्य मादक औषधे यापासून कोसो दूर राहिले पाहिजे असे आवाहन डॉ.इंगोले यांनी केले. या शिबिरांमधून विद्यार्थ्यांमधल्या विविध कौशल्यांना तसेच नेतृत्वगुणांना वाव मिळतो. त्यामुळे महाविद्यालयांनी अशी शिबिरे सतत ठेवण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन ही डॉ.राजेश इंगोले यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांनी योगेश्वरी महाविद्यालयाचे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचे नांव उज्ज्वल करीत आहेत. त्यांची ही गौरवशाली परंपरा प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या परीने पुढे नेण्याचा प्रयत्न करावा महाविद्यालय संपूर्ण ताकदीने विद्यार्थ्यांच्या पाठीमागे उभी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये यश मिळविण्यासाठी आपला तसाच महाविद्यालयाचा नांवलौकीक करण्यासाठी सतत प्रयत्न केला पाहिजे असे यथोचित मार्गदर्शन केले.

# बीडमध्येआज महंत हरिहर महाराज शास्त्री दिवेगावकर यांचे काल्याचे कीर्तन

**प्रतिनिधी** । बीड

बीड शहरातील संकल्प सिद्धी हनुमान नगर, आदर्श गणेश नगर, नगर रोड भागात प्रतिवर्षाप्रमाणे रविवार दि. २ फेब्रुवारी पासुन सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व संगीत भागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळ्याची सांगता महंत ह.भ.प. हरिहर शास्त्री दिवेगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाचे होणार आहे. ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर हे वारकरी संप्रदायातील ख्यातनाम आणि सुपरिचित तत्त्वचिंतक कीर्तनकार असल्याने त्यांच्या कार्यक्रमास मोठी गर्दी असते.

सप्ताहातील काल्याचे कीर्तन सकाळी ११.०० ते १.०० या वेळात होणार आहे. भाविकांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन आदर्श गणेश नगर, संकल्प सिद्धी हनुमान मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाची एसटीच्या विभागीय कार्यशाळेला शैक्षणीक भेट

## विद्यार्थ्यांनी जाणून घेतले बस व्यवस्थापन, तांत्रिक देखभाल, वाहतूक नियोजन

**प्रतिनिधी** । बीड

शहरातील नामवंत आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणीक अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यशाळा १ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी एसटीचे आगार, विभागीय कार्यालय, आणि बसस्थानक याचा संपूर्ण अभ्यास करत तेथील व्यवस्थापन तांत्रिक देखभाल आणि वाहतुकीचे नियोजन याची माहिती जाणून घेतली. ही शैक्षणिक भेट संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ



परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली होती. यामध्ये एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यशाळा आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट दिली तेव्हा कार्यशाळेचे मेकॅनिक हेड रवींद्र आदे व विद्युत विभाग हेड नाना भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तांत्रिक ज्ञान-बसची रचना, इंजिन, ट्रान्समिशन, ब्रेकिंग सिस्टीम, आणि इतर यांत्रिक भागांचे कार्य याबद्दल माहिती दिली. तसेच पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. हरित ऊर्जेचा वापर, इलेक्ट्रिक बसेस, आणि इंधन कार्यक्षम तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली. नियमित सर्व्हिसिंग, वाहन दुरुस्ती आणि मेंटेनन्स कसा केला जातो हे त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवले. या शैक्षणिक भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना बसच्या इंजिन, ट्रान्समिशन, ब्रेकिंग सिस्टिम आणि इतर तांत्रिक बाबींचे प्रत्यक्ष ज्ञान विद्यार्थ्यांना मिळाले. वाहन देखभाल आणि दुरुस्ती प्रक्रियेबद्दल विद्यार्थ्यांना स्वात: जाणून घेता आले. ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग ( मेकॅनिकल) क्षेत्रातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला. केवळ पुस्तकातील ज्ञान न राहता प्रत्यक्ष यंत्रसामग्री आणि तांत्रिक प्रक्रिया पाहण्याचा अनुभव मिळाला त्यातून व्यावहारिक शिक्षण आणि अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. या शैक्षणिक भेटी दरम्यान प्रा. लक्ष्मण तांबे, प्रा. अजय दुधाळ आणि प्रा. नितीन गायकवाड

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त जि. प. प्रा. शाळा खडकी येथे शालेय साहित्य व फळ वाटप संपन्न

**प्रतिनिधी** । वडवणी

महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खडकी (ता. वडवणी) येथे शालेय साहित्य व फळ वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन युवा सेना मराठवाडा निरीक्षक व धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. समाजातील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हा प्रमुख महादेव मतकर, उपजिल्हा प्रमुख शरद झोडगे, खडकी गावचे सरपंच अशोकभाऊ चोले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष वडवणी तालुकाप्रमुख हरिदास करंडे यांनी उपस्थिती लावली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकताना दिसला. नव्या वह्या, पेन, पेन्सिली तसेच फळे मिळाल्याने विद्यार्थी




आणि पालकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात गावातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या वेळी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक गायकवाड सर, सानप मॅडम, जाधव सर, सावंत सर, वरपे सर यांच्यासह इतर शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले आणि अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

# पेठ बीड भागातील विजेच्या प्रश्नासंदर्भात सलीम जहाँगिर यांनी घेतली कार्यकारी अभियंत्यांची भेट

## कुचकामी तारा, पोल, ओव्हरलोड डीपी बदलण्याची मागणी

**प्रतिनिधी** । बीड



पेठ बीड भागात गेल्या काही महिन्यांपासून विजेचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ठिकठिकाणी विजेच्या तारा कुचकामी झाल्या असुन त्या लोंबकळत आहेत. यामुळे नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्याचबरोबर ओव्हरलोड डीपीमुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊ लागला आहे. या प्रश्ना संदर्भात भाजप अल्पसंख्यांक प्रदेश महामंत्री सलीम जहाँगिर यांनी नागरीकांसह वीज कंपनीचे कार्यकारी अभियंता अविनाश सानप यांची भेट घेऊन हे प्रश्न तात्काळ सोडविण्याची मागणी केली.बीड शहरातील पेठ बीड हद्दीतील खुबा कॉलनी, तेलगाव रोड यासह इतर भागांमध्ये वारंवार वीजेची समस्या निर्माण होऊ लागली आहे. खुबा कॉलनीतील डीपी सध्या २०० के.वी.ची आहे. मात्र त्यावर ३०० के.वी.चा लोड असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊ लागला आहे. सदरील डीपी तात्काळ बदलून त्या ठिकाणी ३०० के.वी.ची डीपी बसवावी. लोंबकळलेल्या तारा दुरूस्त कराव्यात, कुचकामी तारा आणि विद्युत पोल तात्काळ बदलण्यात यावेत अशी मागणी यावेळी सलीम जहाँगिर यांनी केली. यावेळी कार्यकारी अभियंता अविनाश सानप यांनी पेठ बीड भागातील शाखा ३ चे इंजि.उमेश कसबे यांना बोलावून या समस्या तात्काळ मार्गी लावण्याच्या सुचना केल्या. यावेळी गफुर पटेल, सययद चांद, इमदाद खान,अब्दुल रहेमान,शेख इस्माईल,डौलात बेग शेख तन्वीर,शेख,जावेद,शेख नदीम,शेख आसिफ, शमसोदीन शेख,शेख लाला आदिजन उपस्थीत होते



सोयगाव - मुबंई येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे साहेब, व विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांची मुबंई येथे भेट घेतली.यावेळी तालुकाप्रमुख दिलीप मचे, सोयगावचे तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते आदी होते.



# पोलीस अधीक्षकांची आता ट्रॅव्हल्सवर नजर

**प्रतिनिधी** । बीड

ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून जर काही अवैध व्यवसाय होत असतील तर यापुढे कोणालाही माफ केले जाणार नाही.कारवाई करण्यापूर्वी पोलीस अधीक्षक कार्यालय मार्फत सर्व ट्रॅव्हल्स चालकांची बैठक घेऊन कायद्याच्या चौकटीत दमदार दम देण्यात आल्याने आता ट्रॅव्हल्स चालकांच्या गोटात खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्यासह पोलीस अधिकाऱ्यांच्या समक्ष ट्रॅव्हल्स मालक यांची बैठक घेण्यात आली. यावेळी ट्रॅव्हल्स मध्ये अवैध गुटखा ड्रग्स गांजा तसेच अवैध कुरिअर अशी वाहतूक कोणी करणार नाही तसेच वाहतुकीवर लक्ष देतील अशा प्रकारच्या सूचना दिल्या. तसेच चालक दारू पिऊन ट्रॅव्हल्स चालवणार नाहीत याची खात्री करणे बाबत मालकांना सूचना दिल्या. सदर बैठकीला सपोनी सानप वाहतूक शाखा व ट्रॅव्हल्स चालक-मालक उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यातील १५०० विद्यार्थ्यांचा 'महाआकाश दर्शन'मध्ये सहभाग

## अबब...चंद्रावर माझे वजन एवढे कमी !

**प्रतिनिधी** । लातुर



आकाशामध्ये एकूण पाच ग्रह एका रेषेत येत आहेत, ही ऐतिहासिक खगोलीय घटना विद्यार्थ्यांना पाहता यावी, यासाठी जिल्हा परिषदेचा प्राथमिक शिक्षण विभाग आणि लातूर स्टीम एज्यूकेशन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी राजस्थान विद्यालाच्या प्रांगणामध्ये 'महाआकाश दर्शन २०२५' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आकाशातील विविध ग्रह, तारे यांची माहिती घेताना आपल्या मनात डोकावलेले प्रश्न विचारून त्याबाबत माहिती जाणून घेतली. एका विद्यार्थ्याने चंद्राविषयी माहिती जाणून घेतला 'अबब...चंद्रावर माझे वजन एवढे कमी !' असे म्हणत त्याला वाटलेल्या कुतूहलातून चंद्राविषयी अधिक माहिती जाणून घेतली.

शालेय विद्यार्थ्यांसाठी खगोलशास्त्र आणि आकाश निरीक्षणाच्या मूलभूत संकल्पनांची ओळख व्हावी, या हेतूने 'महाआकाश दर्शन २०२५' उपक्रमांतर्गत आकाश निरीक्षण आणि खगोलशास्त्रीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विश्वाची निर्मिती कशी झाली, विश्वात कोणकोणते घटक आहेत, विश्वातील आपले स्थान काय, पृथ्वीबाहेर जीवसृष्टी असण्याची शक्यता किती आहे, याबाबत स्लाईड शोच्या माध्यमातून माहिती कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात देण्यात आली. त्यानंतर लेझरच्या सहाय्याने तारकासमूहांची ओळख आणि टेलिस्कोपच्या सहाय्याने विविध ग्रह आणि चंद्र दाखवण्यात आले. अत्याधुनिक प्लॅनेटोरियम डोम (तारांगण) सोबत, विविध ग्रहावरील मानवीय वजन पाहणे यासह वैज्ञानिकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

या उपक्रमात जिल्हाभरातून सुमारे १५०० विद्यार्थ्यांसह पाच ते सात हजार नागरिकांनी 'महाआकाश दर्शन २०२५' उपक्रमाला भेट दिली. प्रारंभी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. राजस्थान विद्यालय शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कर्वा, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, स्टीम एज्युकेशन सेंटरचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरूळे, खगोलशास्त्रज्ञ मयुरेश प्रभूणे, राम स्वामी, अमोल चव्हाण, प्रमोद भोयेरेकर, विजय सहदेव, स्टीम एज्यूकेशन सेंटरच्या प्राचार्य उमा माने, रूपा सिरसेकर, राजस्थान मुख्याधापक श्री. खरोसेकर यावेळी उपस्थित होते.

महाकुंभ पर्वामध्ये पाच ग्रह एकाच रेषेत येण्याचा ऐतिहासिक क्षण जिल्हा परिषद शाळेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी आयोजित या उपक्रमाचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी कौतुक केले.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंगद महानुरे, सुनिल राजुरे, दत्तात्रय माळकर, चंद्रकांत ठाकरे, स्टीम एज्यूकेश सेंटरचे सर्व कर्मचारी, माउंट कार्मेल इंटरनॅशनल स्कूलचे सर्व कर्मचारी, मारवाडी राजस्थान विद्यालयाचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती फुटाणे यांनी केले, तर राधा ढोक यांनी सूत्रसंचालन केले. सतीश भापकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या शुभहस्ते यवतमाळ येथून पाणलोट रथ यात्रेचा राज्यस्तरीय शुभारंभ संपन्न

**प्रतिनिधी** । बीड

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत जलसंधारणाच्या जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या पाणलोट रथयात्रेचा राज्यस्तरीय शुभारंभ आज यवतमाळ येथून करण्यात आला.शुभारंभ झाल्यानंतर ही यात्रा दिग्रस तालुक्यातील लाख, तुपटाकळी, काटी, रामनगर गावाकडे रवाना झाली. त्यानंतर वाशिम जिल्ह्यात ही यात्रा जाणार आहे. आज एकाचवेळी तीन यात्रा वेगवेळ्या ठिकाणाहून आज रवाना झाल्या. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या राज्यातील १४० प्रकल्प क्षेत्रातील ३० जिल्ह्यातील ९७ तालुके व ३६० गावातून पाणलोट रथ ५० दिवस जनजागृतीचे काम करणार आहे. शुभारंभावेळी मृद व जलसंधारणाची सामुहिक शपथ घेण्यात आली.

यात्रे दरम्यान पाणलोट अंतर्गत नवीन कामांचे भूमिपूजन, झालेल्या कामांचे जलपूजन तसेच लोकार्पण, वृक्ष लागवड, जुन्या पाणलोट कामांची दुरुस्ती, भूमी जलसंवाद, श्रमदान असे उपक्रम होणार आहेत. यात्रेत दृकश्राव्य




पद्धतीचे फिरते मोटार वाहन राहणार असून गावकऱ्यांना आभासी पाणलोट सहलीचा अनुभव घेता येईल. यात्रे दरम्यान माती व पाणी परीक्षण केले जाईल. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेतून शेतकऱ्यांना धरण व तलावातील गाळ शेतात टाकण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

# माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी - डॉ. मनोहर सिरसाट

**प्रतिनिधी** । बीड

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनात त्यांची सावली बनलेल्या माता रमाई आंबेडकर यांचे संपूर्ण आयुष्य हे दुःख, त्याग, समर्पण आणि करुणेने भरलेलं होतं. त्यांनी आयुष्याचा खडतर प्रवास करत अखेरच्या क्षणापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समर्थ साथ दिली. त्यांचा त्याग आणि संघर्ष प्रेरणादायी आणि आदर्शवत असून त्यांच्या संघर्षमय जीवनातून आपण प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन बीड येथील बलभीम महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ.मनोहर सिरसाट यांनी व्यक्त केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त शुक्रवार ता.७ जानेवारी रोजी तुलसी महाविद्यालयात विशेष व्याख्यान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते,या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे होते तर तुलसी फॅशन कॉलेजच्या प्रा.अश्विनी बेद्रे, तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य मिलिंद वडमारे,तुलसी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश ढोकणे यांची प्रमुख



उपस्थिती होती.पुढे बोलतांना प्रोफेसर डॉ.मनोहर सिरसाट म्हणाले की, माता रमाई यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची खूप मोठी आहे. त्यांनी बाबासाहेबांच्या सदैव सोबत राहून त्यांच्या कार्यात खंबीर साथ दिल्यानेच बाबासाहेब हे आपले कर्तृत्व सिद्ध करू शकले, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांनी माता रमाई यांच्या जीवनातील विविध पैलूंसंबंधी आपले विचार व्यक्त केले आणि माता रमाई जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे तर आभार प्रा.शिल्पा बोराडे यांनी मानले. यावेळी तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागसेन बुद्ध विहार बीड येथे माता रमाई यांची १२७ वी जयंती हर्ष उल्हासात साजरी

## माता रमाई यांच्या जयंतीदिनी प्रो.डॉ राणी जाधव यांचा सत्कार

**प्रतिनिधी** । बीड

लहानपणी शाळेतील वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेणाऱ्या भिवाला जीवनसाथी म्हणून सुभेदार रामजीबाबांनी बापाविना पोरकी असलेल्या रमाईला सून म्हणून आपल्या घरी आणले. या माता रमाईने कोणत्याही प्रकारच्या सुखाची अपेक्षा न करता प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेबरुपी महासागरा बरोबर संसार करताना जीवनभर दुःखाच्या अनेक लाटा सहन केल्या. अतिउच्च शिक्षण घेतलेल्या डॉ.बाबासाहेबानी खोऱ्यानी पैसा ओढला असता परंतु अंधारात खितपत पडलेल्या दीनदलीत समाजाच्या, स्त्री पुरुषांच्या उद्धाराकरिता,व देशाच्या प्रगती करता जीवनभर कष्ट केले.आपल्या सुखी संसाराकडे,आपल्या आर्थिक परिस्थितीकडे त्यांनी लक्ष दिले नाही. औषध पाण्याशिवाय, वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे ४ लेकरांना



गमवावे लागले त्या थोर त्याग मूर्ती रमाईचा आज २१ व्या शतकातील कोणत्याही स्त्री पुरुषांना विसर पडू नये असे भावपूर्ण उदगार माया दिवाण यांनी काढले. आपल्या पतीच्या शिक्षणाकरता पै पै जमा करण्या करीता गवऱ्या थापून संसार करणाऱ्या व पती अतिउच्च शिक्षण घेऊन मायदेशी परत आल्यावर त्यांच्या अंगावर धड लुगडे ही नाही याचा विचार न करता थोर छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांना सत्कार प्रसंगी दिलेला फेटा नेसून स्वतःला गर्दीत लपवून डॉ. बाबासाहेबांचा सत्काराचा सोहळा पाहण्याचा माता रमाईचा तो हृदयस्पर्शी प्रसंग माया दिवाण यांनी सांगतांना श्रोत्यांचे डोळे पाणावले.

नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती दिनी विनम्र अभिवादन कार्यक्रम प्रसंगी आयु. केशरताई कांबळे अध्यक्षपदी लाभल्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री माया दिवाण उपस्थित होत्या,विचार मंचावर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय गढी येथील गृहविज्ञान विभाग प्रमुख प्रो.डॉ राणी जाधव यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या प्रतिमेस पुष्प व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक से.नि जिल्ह प्रबंधक (एलआयसी) यु एस वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन बौद्धाचार्य ज्ञानोबा पोटभरे यांनी केले. याप्रसंगी प्रो.डॉ राणी जाधव यांची पीएच.डी करित असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून निवड व प्रोफेसर पदी पदोन्नती झाल्याबद्दल नागसेन बुद्ध विहाराच्या वतीने यतोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी दान पारमिताचे पालन करून एडवोकेट राहुल मस्के यांनी आपल्या आईच्या पहिल्या स्मृतीदिनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या अनमोल ग्रंथाच्या बारा प्रति वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचायला बीड शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये वितरित करण्यासाठी दिल्या होत्या त्यापैकी दोन ग्रंथ वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचनालयामार्फत विहार समितीकडे सुपूर्द करण्यात आले. याप्रसंगी प्रो.डॉ राणी जाधव, प्रा व्ही आर गाडे, आयु पुष्पाताई वडमारे त्यांनी देखील माता रमाईच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ज्ञानोबा पोटभरे यांनी केले. कार्यक्रमास नागसेन बुद्ध विहारातील सदस्य, परिसरातील बहुसंख्या बंधू-भगिनींची व बालकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता सरणातयने झाली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जि.प.प्राथमिक शाळा शेरी बुद्रुक येथील विद्यार्थ्यांची खरी कमाई

प्रतिनिधी । कडा



तालुक्यातील जि.प प्राथमिक शाळा शेरी बु येथे दि.८ रोजी बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यामध्ये विद्यालयात पहिली ते चौथी विद्यार्थ्यांचा बाल आनंद मेळावा घेण्यात आला.यात विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' याची जाणीव होण्यासह विविध व्यवसाय व व्यवहाराची माहिती व्हावी,यासाठी हा बाल आनंद मेळावा घेण्यात आला.

या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ पदार्थ व वस्तूचे स्टॉल लावले होते.यात पाणीपुरी, भेळ,पालेभाज्या,गुलाब जामुन, कचोरी,वडापाव,इडली,भजे, पॅटिससह पालेभाज्या,बटाटे,वांगी, पालक,मेथी,गाजर,आवळा,पपई आदीचे स्टॉल लावले होते. बाल आनंद मेळाव्यात एकूण ५० ते ६० स्टॉल होते.या मेळाव्यात मुलांना व्यवहार ज्ञान,नफा-तोटा, फायदा-नुकसान व हिशोब ताळमेळ हे सर्व कौशल्य विद्यार्थ्यांना या मेळाव्यातून शिकण्यास मिळत असते.मेळाव्यासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक,सरपंच,उपसरपंच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी तसेच पुरुष व महिला पालकवर्ग यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यातून व्यवहारिक ज्ञान घडते - मुख्याध्यापक योगेश जगताप

आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आर्थिक देवाण-घेवाण तसेच व्यावहारिक ज्ञान लहानपणीच विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून हा बाल मेळावा आयोजित केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना फायदा तोट्याची माहिती मिळते - योगेश जगताप,मुख्यध्यापक शेरी बु.

विद्यार्थ्यांमध्ये कला कौशल्य निर्मितीसाठी असे उपक्रम फायद्याचे - दिपक सोनवणे

आमच्या शाळेतील मुख्याध्यापकांसह शिक्षक सर्व विध्यार्थ्यांना वेगवेगळ्या माध्यमातून नेहमीच विविध प्रकारच्या कला कौशल्य आत्मसात होण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करीत असतात त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते. - दिपक सोनवणे,शालेय शिक्षण समिती,शेरी बु.

# खरेदी केंद्र बंद ; जिल्ह्यात लाखो टन सोयाबीन खरेदीविना

केंद्र सरकारने दिलेला खरेदी कोटा पूर्ण झालेला नसताना एकूण बीड जिल्ह्यातील नाफेडकडील ४४ हजार ७४४ या नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी फक्त २० हजार ९६९ एवढ्याच शेतकऱ्यांचा माल खरेदी केलेला आहे. म्हणजे ५०% सुद्धा शेतकऱ्यांचा माल खरेदी न करता देखील तारखांचे दाखले देऊन शासकीय खरेदी केंद्र बंद करण्यात आले आहेत.सोयाबीन हमीभावाने पूर्ण खरेदी सरकरने करावी यासाठी पुन्हा रस्त्यावर उतरून लढाई करावी लागणारी आहे अशी खंत किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी व्यक्त केली आहे.

सत्तेत आलेल्या महायुतीच्या सरकारने निवडणुकीत सोयाबीनला ६ हजार रुपयांचा हमीभाव असे आश्वासन दिले होते. त्यानंतर राज्यसरकारने प्रतिक्विंटल ६,९४५ रु हमीभाव शिफारस केलेली असताना केंद्रसरकारकडून ४,८९२ रु हमीभाव जाहीर केला होता परतु शासकीय खरेदी केंद्रावर शेतमाल विकलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा हमाली-काढता-बारदाना या नावाखाली प्रतिक्विंटल १५० ते २०० रुपयाला शेतकऱ्यांचा खिसा मारून, जाहीर केलेला हमीभाव सुद्धा न देण्याचे पाप या सरकारने केले असून आणि आत्ता तर थेट शासकीय खरेदी केंद्र बंद तारखेचा दाखला देत बंद करण्यात आली आहेत. काल पर्यंत रस्त्याच्या रांगेत उभ्या असलेल्या सोयाबीनचा हमीभावानुसार ४,८९२ प्रतिक्विंटल असलेला भाव आत्ता खाजगी व्यापाऱ्याकडे ३,८०० रु सुद्धा मुश्किलीने विकावा लागत आहे. अन्यथा वर्षभर सोयाबीन घरात सांभाळावी लागेल. अशाप्रकारे शेतकऱ्यांना चिमटीत पकडून आत्मनिर्भरतेची दवंडी सरकार वाजवत आहे.

भारतामध्ये तेलबियांची गरज़ खूप मोठी आहे. देशातील वाढती लोकसंख्या आणि लोकांच्या बदलत्या आहारामुळे तेलबियांच्या मागणीत वाढ झाली आहे. देशात दरवर्षी सुमारे ३५० लाख टन तेलबियांची आवश्यकता असते.भारतातील तेलबियांचे उत्पादन गरजेपेक्षा कमी असल्याने, मोठ्या प्रमाणात तेलबियांची आयात करावी लागते. आपली आयात गुणवत्ता ६०% ते ६५% इतकी आहे.तेलबियांच्या आयातीमुळे दरवर्षी सुमारे ७० ते ८० हजार कोटी रुपये तेलबियांच्या आयातीवर खर्च होतात.हे अवलंबित्व कमी करण्यासाठी आत्मनिर्भरतेचे पोकळ प्लॅन बनवले जातात, पण योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे वेळोवेळी आयात वाढत जात असताना आपल्याच देशातील शेतकऱ्यांचा माल तारखांच्या आकडेवारीवरून खरेदी करण्याचे थांबवणे म्हणजे आरोपीला न्यायालयाने तारखाच्या कचाट्यात अडकाव त्याचप्रमाणे हे सरकार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी वागत आहे.त्यामुळं सोयाबीन पिकवणे गुन्हा आहे कि काय असे भासू लागले आहे.

वेळोवेळी, या प्रश्नांची उकल करून निवेदन- चर्चा करून देखील जर सरकार त्याच चालीवर राहणार असेल तर शेतकरी भावा-बहिणींनो कायदे आणि धोरण ठरवणाऱ्या, खुर्च्या आपल्याशी सावत्र वागत असतील तर आत्ता आपल्याला रस्त्यावर यावं लागेल. आणि आपण पिकवलेल्या माल हमीभावानेच खरेदी करण्यासाठी या सरकारला भाग पाडावे लागेल.हा एकच मार्ग सरकारने आपल्यासमोर ठेवला आहे. आज सोयाबीन उत्पादक शेतकरी जात्यात आहे परंतू इतर सगळे शेतकरी सुपात आहेत हीच वेळ उद्या कापूस हरभरा तूर या सर्वच शेतकऱ्यांवर येऊ नये म्हणून या सरकारची कोंडी करण्यासाठी सर्व शेतकरी, शेतकरीपुत्रांनो कंबर कसून लढण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हा कमिटी करत आहे.

## जगद्गुरु श्री नरेंद्राचार्य महाराज यांचा आंबेजोगाई येथील पादुका दर्शन सोहळ्यामध्ये

# ५५ गोरगरीब व गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

प्रतिनिधी । अंबाजोगाई



अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या दिव्य पादुकांचे दर्शन अंबेजोगाई येथे हजारो भाविक भक्तांनी घेतले.सकाळी ८ ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत पूर्ण दिवसभर कार्यक्रम सुरू होता.२८ जानेवारी रोजी मंगळवारी अंबेजोगाई येथे सकाळीच ९ वाजता आंबेजोगाई येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणुकी मध्ये समोर बॅन्जो गाडी, त्याच्या पाठी मागे मिरवणुकीचा बॅनर, कलशधारी महिला, निशाण धारी महिला, संबळ पथक, निशाण धारी पुरुष, वासुदेव पथक,५ घोडे आणि ६ ऊंट यांच्यावर महापुरुषांचे वेगवेगळे देखावे, भजणी मंडळ, माऊलींचा रथ ५ ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचे वेगवेगळे देखावे आणि त्यांच्या पाठीमागे इतर भक्तगण अशी मिरवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे कार्यक्रम स्थळी १२ वाजता पोहोचली. संत पिठावर आल्यावर स्वामींची आरती करण्यात आली, त्यानंतर बीड जिल्ह्यातील राजकीय मान्यवरांच्या हस्ते गोर गरीब व गरजू महिलांना ५५ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. त्यानंतर चिठ्ठ्या टाकून भक्तगणातून एका भाविकांची लहान मुलांच्या हाताने चिठ्ठी काढण्यात आली त्यांच्या हस्ते संतपिठावरील गुरु पूजन व मंडप मधील भक्तगणांचे गुरुपूजन झाले, त्यानंतर जनम. प्रवचनकार सौ. तनवी मोरे ताईंचे प्रवचन झाले. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला, या कार्यक्रमांमध्ये ४०६ भक्तगणांनी भक्त दीक्षा घेतल्या. त्यानंतर सिद्धपादुकाच्या दर्शना साठी भाविकांच्या लांब पर्यंत रांगा लागल्या होत्या रात्री ९ पर्यंत दर्शन चालू होते.त्यानंतर सिद्ध पादुका पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाल्या.या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी आयोजक जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ अंबेजोगाई व बीड जिल्हा यांच्या वतीने

# शिदोड येथील श्री महालक्ष्मी महाविद्यालयात परीक्षेच्या काळातील ताण तणावातून विद्यार्थ्यांना मुक्त करण्यासाठी आरोग्य व्याख्यान संपन्न

## मुक्त संवादाने तणावावर मात करा - मानसोपचार तज्ञ डॉ.मनीषा बिक्कड

प्रतिनिधी । बीड



अलीकडच्या काळातील जीवनमान दिवसेंदिवस धावपळीचे बनत आहे. शैक्षणिक करिअर अन् दैनंदिन जीवनात देखील जीव घेणी स्पर्धा वाढली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांत ताण-तणाव निर्माण होताना दिसतात. परंतु, सकारात्मक विचार, छंद जोपासणे, यश मिळविण्यासाठी प्रामाणिकपणे केलेली मेहनत व प्रत्येक गोष्टीचे नियोजन, आपल्या आवडत्या गोष्टींना प्राधान्य देणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शिक्षक, पालकांशी मुक्त संवाद साधणे या गोष्टी केल्यास नक्कीच ताण-तणाव दूर सारून आयुष्यात यशस्वी होता येते असा आशावाद बीड शहरातील प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉक्टर मनीषा बिकड यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय परीक्षेच्या काळातील ताण-तणाव व विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्याना प्रसंगी बोलताना व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर हे होते तर व्यासपीठावर योगशिक्षक डॉ. संजय तांदळे, पत्रकार आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर योगशिक्षक तथा समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉक्टर संजय तांदळे म्हणाले की,यश-अपयश हे प्रत्येकाच्या आयुष्यात सुरूच असते. परंतु, विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून न जाता आपले ध्येय समोर ठेवून यशाकडे वाटचाल करणे गरजेचे आहे. अपयशाची करणे शोधण्या ऐवजी यशाचे मार्ग शोधावेत असे डॉ. तांदळे म्हणाले. त्यानंतर बीड शहरातील प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. मनीषा बिक्कड मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी त्या पुढे बोलताना म्हणाल्या की, आज विद्यार्थी व पालकांचा संवाद हरवत चालला आहे. विद्यार्थी एकलकोंडे बनत चालले आहेत. काही ठिकाणी विद्यार्थी पालकांना प्रतिसाद देत नाहीत, तर काही ठिकाणी पालकांना आपल्या मुलांसाठी वेळच नाही, असे प्रकर्षाने जाणवते. तर दुसरीकडे आजची तरुणाई व विद्यार्थी हे मोबाइल फोन, सोशल मीडिया यातच व्यस्त दिसतात. आपल्या मनातील प्रश्न व समस्या शेअर न केल्याने त्यांच्यात तणाव वाढत असून, ते नैराश्याच्या गर्तेत सापडताना दिसतात, असे निरीक्षण त्यांनी नोंदविले. यावर उपाय म्हणजे विद्यार्थ्यांचा पालक व शिक्षकांशी मुक्त संवाद वाढणे, चांगले मित्र-मैत्रिणी निवडणे, अपयशातून यशाकडे यशस्वी वाटचाल केलेल्या व्यक्तींचा आदर्श ठेवणे गरजेचे आहे, असा सल्लाही डॉ. मनीषा बिक्कट यांनी यावेळी दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी तर आभार श्रीमती साळुंके मॅडम यांनी मानले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# देळेगव्हाण सातेफळ रस्त्याचे निकृष्ठ दर्जाचे काम देळेगव्हाण ग्रामस्थांकडून बंद

## निकृष्ठ झालेले काम पुन्हा करा ,अन्यथा ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । जाफराबाद

देळेगव्हाण ते सातेफळ मार्गे विदर्भाला जोडणाऱ्या या शॉटकट रस्त्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू असून हे काम पूर्णपणे बोगस सुरू असल्याचे अनेकवेळा ग्रामस्थांनी संबधित ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगूनही कामात सुधारणा होत नसल्याने देळेगव्हाण येथील ग्रामस्थांनी हे काम बंद पाडून झालेले बोगस काम पुन्हा करा अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या या कामच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे सूचना फलक न लावताच ठेकेदाराने कामाचा सपाटा सुरू केले असल्या चे चित्र अनेक वेळा निदर्शनास आले आहे .या रस्त्यावर अनेक छोटे मोठे अपघात घडले असून जीवितहानी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही .

देळेगव्हाण ते सातेफळ पर्यंत या रस्त्यावर अनेक ठिकाणी ठेकेदाराने सिमेंट पूल बनवले असून एकीकडून पुलाचे बांधकाम झाले की लगेच त्या ठिकाणाहून रहदारी सुरू करण्यात येत असून तो पूल खचून जाण्याची दात शक्यता वर्तवली जात आहे.देळेगव्हाण येथील जिल्हा परिषद शाळेजवळ व गावातूनच हाकेच्या अंतरावर असलेल्या मल्हार कापसे या शेताजवळ एकीकडील पूल बांधण्यात आले असून या दोन्ही ठिकाणची सरपंचासह ग्रामस्थांनी पाहणी केली असता अगदी सहजपणे हाताने या सिमेंट पुलाचे खापरे बाहेर पडू लागल्याने ग्रामस्थांनी हे काम बंद पाडून संबधित ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांवर कार्यवाही करण्याची मागणी केली.यावेळी सरपंच शिवाजी कापसे, परमेश्वर कापसे,परमेश्वर बनकर ,गणेश पंडित, मारुती कव्हळे,सचिन बनकर,भारत हिवाळे,हर्षवर्धन हिवाळे,सोपान कापसे,भगवान बनकर,अमोल कापसे ,अमोल वरशील ,समाधान कापसे,मल्हार कापसे यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

राज्य सरकार कडून कोटींचा निधी

मराठवाडा ते विदर्भाला जोडणारा हा एकमेव शॉटकट मार्ग असून राजूर गणपती येथे दर्शनासाठी या रस्त्याचा वापर भाविक करतात. शिवाय देळेगव्हाण ,डोणगाव,पोखरी, निवडुंग,उमरखेड आदी गावातील लोक देराजाला जाण्यासाठी या रस्त्याचा वापर करतात .या रस्त्याची मोठी दुर्दशा झल्याने यासाठी ३० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.

सात ते आठ बालकामगारांचा समावेश

देळेगव्हाण सातेफळ या रस्त्यावर मजुरांकडून मुरूम टाकण्याऐवजी बालकामगाराकडून माती टाकण्यात येत आहे.यात संबधित ठेकेदाराने बालकामगार दिले असल्याचे दिसून येत आहे. बालकामगाराना कमी पगार द्यावा लागत असल्याने ठेकेदाराने बालकामगाराला एक पसंती दिली आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन ठेकेदारावर कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

अभियंत्यांची मनमानी, ठेकेदाराच्या पाठीशी

या देळेगव्हाण सातेफळ रस्त्याच्या बोगस कामा संदर्भात परिसरातील नागरिकांनी वारंवार या अभियंत्यांशी संपर्क साधला असता त्याची मनमानी ऐकायला मिळाली, मी पैसै देऊन नव्हे तर घासून लागलो असून तुमचं काय तर माझ्या कार्यालयात या ,मला वेळ नाही असे उद्धट ग्रामस्थांशी बोलून त्यांनी एक प्रकारे सार्वजनिक बांधकाम विभाग ठेकेदाराच्या दावणीला बांधले असल्याचे दाखवुन दिले.

ग्रामस्थांकडून पोलिसांना अर्ज

बोगस असलेले काम ग्रामस्थांनी बंद पाडल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांकडून गुन्हा दाखल करण्याचा धमकी वजा इशारा ग्रामस्थांना देण्यात आला




यावेळी ग्रामस्थांनी टेंभुर्णी पोलीस ठाणे गाठून ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यां विरोधात तक्रार अर्ज देण्यात आला.

नुकत्याच झालेल्या सिमेंट पुलाला भेगा

देळेगव्हाण सातेफळ रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून सुरू असून या रस्त्यावर अनेक ठिकाणी सिमेंट पुले बांधण्यात आली आहे .ही सर्व पुलाची बांधकाम बोगस झाली असल्याचे गावातील बांधकाम झालेल्या पुलावरून ग्रामस्थांच्या लक्षात आले आहे. चार दिवसापूर्वी या दोन ठिकाणी पूल बांधण्यात आली त्या पुलाची खापरे अगदी हलक्या हाताने गळून पडली असून त्याला महाकाय भेगा पडल्या आहेत.

# रावसाहेब पाटील दानवे कॉलेज फार्मसीची कार्यकारणी घोषित

प्रतिनिधी । बदनापुर

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ ची बदनापूर येथिल रावसाहेब पाटील दानवे कॉलेज ऑफ फार्मसी ची कार्यकारणी घोषणा करण्यात आली यावेळी कॉलेज अध्यक्ष म्हणून रोहीत कंगले तर कॉलेज मंत्री नकुल गोडसे यांची घोषणा करण्यात आली यावेळी जालना जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे बदनापूर शहर सहमंत्री अनिकेत इंगळे , फार्मा व्हीजन संयोजक अभिराज तांभुरे , जयेश रनबावळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# समाज कल्याण वस्तीगृह प्रमुख अजित शेजूळ याची निवड

प्रतिनिधी । बदनापुर

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ ची बदनापूर येथील समाज कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृह येथील वसतिगृह समिती घोषणा करण्यात आली. यावेळी वसतिगृह प्रमुख म्हणून अजित शेजुळ, सह प्रमुख कार्तिक गायके, सहप्रमुख पंकज नागरे, अभ्यासमंडळ प्रमुख समाधान जाधव तर सदस्य म्हणून कुलदीप खरात यांची घोषणा करण्यात आली. यावेळी बदनापूर शहर कार्यकारिणी सदस्य जयेश रणबावळे उपस्थित होते.




# जुगार अड्ड्यावर धाड; जुगारी फरार, लाखोंचा ऐवज जप्त

प्रतिनिधी । परळी

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील बस स्थानक रोडवर एका इमारतीमध्ये मोबाईलवर ऑनलाईन कल्याण मुंबई नावाचा जुगार चालू असल्याची खबर पोलिसांना मिळाली. यावरून परळी ग्रामीण पोलिसांच्या एका पथकाने शुक्रवारी रात्रीच्या सुमारास या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस आल्याची चाहूल लागल्याने जुगारी पाठीमागील दरवाजातून पसार झाले. तेवढ्यात समोरील दरवाजातून पोलिस दाखल झाले. जुगारी हाती लागले नाही, पण पोलिसांनी यावेळी तीन लाख २३ हजार रुपये ८० रुपये किमतीचे जुगार साहित्य व रोख रक्कम जप्त केली आहे. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात ८ फेब्रुवारी रोजी पहाटे जगन्नाथ फड, शिवाजी पांचाळ, अक्षय सावंत (राहणार धर्मापुरी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी दुपारपर्यंत यातील एकाही आरोपीस अटक करण्यात आली नव्हती.

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील बस स्थानकाजवळ एका इमारतीमध्ये मुंबई कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेलविला जात असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यावरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार पोलीस उपनिरीक्षक रियाज शेखलाल, निमोणे व पोलीस हेड कॉन्स्टेबल पांडुरंग वाले, पोलीस कर्मचारी चेमटे व इतर कर्मचाऱ्यांनी सात फेब्रुवारी रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस पथक आल्याचे समजताच जुगार चालक आणि जुगारी पाठीमागील दरवाज्यातून उड्या टाकून पळून गेले. त्यामुळे एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागला नाही.



माननीय अनिल चांदणे यांची भाजप अनुसूचित मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. सोबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश भैया क्षीरसागर. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग बबनराव वाघमारे. उपाध्यक्ष मिलिंद ठोकळ. श्याम माने सर. कैलास आव्हाड

# मृत्युंजय कादंबरी देऊन सरस्वती बुक हाऊसमध्ये सुरेश साळुंकेंचा गौरव

बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंकेंचे

विविध वैवाहिक आणि सांस्कृतिक समारंभातले निवेदन हे आशयपुर्ण आणि रसाळ पूर्ण असते म्हणून निवेदक सुरेश साळुंके यांनी निवेदनासारख्या प्रगल्भ क्षेत्रांमध्ये अभिजात दर्जा आसलेल्या मराठी भाषेत निवेदन करुन भारतीय संस्कृतीचे सांस्कृतिक मूल्य सांगत सनातन धर्माबद्दल आवर्जून बोलत जनजागृती करतात.म्हणून बीड येथील सरस्वती विद्या डेपोचे अतुलजी तरळकल यांनी सुरेश साळुंकेंना मराठी भाषेतील सुप्रसिद्ध लेखक शिवाजी सावंत यांच्या प्रतिभाकोषात निर्माण झालेले ज्ञानपीठ मूर्ती पुरस्कार विजेती मृत्युंजय ही कादंबरी सप्रेम भेट देऊन



अभिनंदन केले आहे. निवेदक सुरेश साळुंकेंच्या निवेदन प्रेमातून अतुलजींनी मृत्युंजय कादंबरी ही देऊन अभिनंदन केल्याच्या प्रित्यार्थ बोलताना निवेदक सुरेश साळुंखे म्हणाले की मराठी भाषेला अभिजात दर्जा भेटला त्या मराठी भाषेचा राजमुकुट आसलेली मृत्युंजय कादंबरी आपणास निवेदनाबद्दल सप्रेम भेट मिळते हि परेहुनी पर्ते गोष्ट आहे. कारण मृत्युंजय हि कांदबरी प्रतिभेचा मृत्युंजयी स्त्रोत आहे. सरस्वती बुक हाऊसचे संचालक अतुलजी यांनी दिलेली मृत्युंजय कादंबरी हि साक्षात सरस्वती देवीचा प्रसाद आहे. कारण मृत्युंजय मधील प्रत्येक अक्षरांमधुन प्रतिभेचा अस्खलित मराठी सुगंध दरवळतो. म्हणून अभिनंदन करण्यासाठी मृत्युंजय ही दिलेली कादंबरी माझ्या आयुष्यातील एका वळणदार वळणावरची तहाणलेल्यासाठी अमृतपान करणारी अमृतपोई आहे. मराठी भाषेतून निवेदन करून अभिजात दर्जा उंचावत जावा म्हणून सातत्याने प्रयत्न करणाऱ्या सुरेश साळुंकेंचा मृत्युंजय कादंबरी देऊन अभिनंदन केल्याबद्दल धार्मिक अध्यात्मिक सांस्कृतिक क्षेत्रामध्ये कौतुक होत आहे.

# मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड येथे माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न

माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती इतर शहरापेक्षा मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी विशेष आणि वेगळ्या पद्धतीची असते. मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड येथील रमाई महिला मंडळ या मंडळाच्या कार्यकर्त्या,, आणि भारतीय बौद्ध महासभा मध्ये सक्रिय काम करणाऱ्या या महिला प्रत्येक वर्षी माता रमाईची जयंती एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करतात. या जयंतीच्या निमित्त महिला वर्गांना प्रभावित आणि प्रेरित करण्यासाठी ,,विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येतं. दिनांक ०६.०२.२०२५ रोजी महिलांच्या विविध संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेलं होतं.. यामध्ये संगीत खुर्ची लिंबू चमचा,, फुगडी,, तळ्यात मळ्यात व विविध स्पर्धे प्रकारच्या गीत गायन स्पर्धा आयोजित करून महिलांना प्रभावित करण्यात आले.. ज्या महिला या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवतील ,,उत्कृष्ट प्राविण्य मिळवतील त्यांना बक्षीस म्हणून साडीचे वाटप करण्यात आले. त्यामुळे परिसरातील जवळपास सर्वच महिला या जयंतीच्या उपक्रमामध्ये तन-मनाने सहभाग नोंदवला.. या जयंतीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने सदरील कार्यक्रमाचे ध्वजारोहण नगराध्यक्ष जगताप मॅडम ,,वडवणी पोलीस स्टेशनचे ए पी आय सन्माननीय अमन शिरसाट सर ,व अनेक मान्यवर मंडळीच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. दिनांक सात फेब्रुवारी २०२५ रोजी माता रमाई यांच्या प्रतिमेंचं पूजन करून,, माता रमाई ची प्रतिमा संपूर्ण वडवणी शहरांमध्ये मिरवणूक काढून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने ,वडवणी शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील ,,बौद्ध उपासक उपासिका यांना भोजन दानाची व्यवस्था केलेली होती. अनेक मान्यवर मंडळींनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपापले विचार मांडले.. मान्यवर मंडळींचा या ठिकाणी सर्व भीम नगर वाशी यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या उपक्रमामध्ये वडवणी कर ,,अगदी आनंदी झालेले होते. माता रमाईच्या जयंतीच्या निमित्ताने मुलींनी लेझीम पथकामध्ये सहभाग नोंदवला.. अतिशय उल्हासित वातावरणामध्ये मिरवणूक काढण्यात आली.. व जल्लोषपूर्ण



वातावरणामध्ये सायंकाळी सर्वांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.. या कार्यक्रमाच्या निमित्ताने भीम नगर मधील सर्वच महिला मंडळी बौद्ध उपासक उपासिका यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.



# परळीच्या शिरपेचात आणखीन एक तुरा इंजि.राजू जगतकर दुबई येथे निवड

परळी ।प्रतिनिधी

परळीचे भूमिपुत्र इंजि. राजू श्रावणराव जगतकर, अपर्णा जगतकर,व संपादक बालाजी जगतकर यांचे छोटे बंधू ज्यांची दुबई येथे बुलेट रेल्वेच्या ऑपरेशन मॅनेजर पदी निवड झाली. त्यांनी दिल्ली व मुंबई येथे वेगवेगळ्या पदावर मेट्रो रेल्वेचे काम पाहिले आहे. अनेक विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून मुंबई मेट्रो येथे काम करण्यासाठी प्रेरित केले आहे. ते येत्या १४ फेब्रुवारी रोजी दुबई येथे प्रत्यक्ष कामावर रुजू होत आहेत. त्यांची निवड झाल्याबद्दल मित्र परिवार व आप्त स्वकीयांकडून सत्कार व विदेशात जाणार आहेत, त्यानिमित्ताने निरोप समारंभ प्रसंगी शाल श्रीफळ पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन परळी समाचार चे संपादक आत्मलिंग शेटे, राजेश साखरे सहशिक्षक वैद्यनाथ विद्यालय, रामकिशन सावंत, प्रमोद सावंत, श्रावणराव जगतकर, बालाजी जगतकर सिद्धार्थ जगतकर आदी दिसत आहेत.

# श्री विश्वकर्मा जयंती व भव्य मिरवणूक उत्सवास समाज बांधवांनी उपस्थित राहावे - परमेश्वर पांचाळ



प्रतिनिधी । माजलगांव

येथील श्री संत ज्ञानेश्वर नगर,नवीन वसाहत भटवडगाव येथे दि १० फेब्रुवारी २०२५ रोजी श्री विश्वकर्मा जयंती व भव्य अशी मिरवणूकी उत्सवाचे आयोजन श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना व श्री विश्वकर्मा विठ्ठल -रुक्मिणी प्रतिष्ठान मंडळाच्या वतीने करण्यात आले असून या जयंती उत्सवात समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे,असे आवाहन तालुका अध्यक्ष परमेश्वर पांचाळ यांनी केले आहे.

भक्तांना कळविण्यात येते की,श्री विश्वकर्मा प्रभुच्या कृपेनेचा आशिर्वादाने वगुरच्यिा प्रेरणेने आणि सर्व भाविक भक्तांच्या सहकायनि प्राप्रमाणे याहीवर्षीर्थी श्री विश्वकर्मा व विद्युल रुक्मिणी मंदिर श्री संत ज्ञानेश्वर नगर, नविन बराहत भाटवडनाव येथे सोमवार दि.१० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते १२ श्री विश्वकर्मा जयंती व भव्य मिरवणुक उत्सव सोमवार दि. १० फेब्रुवारी २०२५ सकाळी ८ ते १२ या दरम्यान होईल आणि लगेच महाप्रसादाचे आयोजन केले आहे कार्यक्रमाची रूप रेषा अशी आहे,माऊली दादा वारकरी शिक्षण थान,श्री क्षेत्र भेंड टाकळी (गणेश महा ज लोंढे)वेळ दुपारी १२ ते २- काल्याचे किर्तनकार श्री.ह.भ.प.मृदंग अलंकार अशोक महाराज पांचाळ(आळंदीकर)काल्याच्या किर्तनानंतर दु.२ ते ५ महाप्रसाद होईल. या वेळी प्रमुख उपस्थिती आ.श्री.प्रकाशदादा सोळंके (आमदार,माजलगाव),माजी आ.राधाकृष्ण अण्णा होके पा.(मा.आमदार, माजलगाव),आ.विजयराजे पंडित (आमदार गेवराई),मोहनदादा जगताप (व्हा.चेअरमन,छ.स.सा. का. सावरगाव),जयसिंह भैय्या सोळंके (मा.जि.प.सदस्य),मा. माधवतात्या निर्मळ(प्रमुख, नर्मदा उद्योग समुह)बाबरीसेठ नेत मुंडे (मा.नगराध्यक्ष वडवणी), कल्याणभाऊ आबुज (मा.जि.प.),गिताराम अनभुले(मा.सरपंच), कृष्णाकांत कुटे(मा.सरपंच), मा.किशोर फुलसरे(सरपंच) समस्त पत्रकार बंधु, माजलगाव यांची असणार आहे. संयोजन समिती खालील प्रमाणे असणार आहे.श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना व श्री विश्वकर्मा विठ्ठल-रुक्मिणी प्रतिष्ठाण मंडळ श्री संत ज्ञानेश्वर नगर, नविन वसाहत,भाटवडगाव ता.माजलगाव तरी या भव्यदिव्य धार्मिक कार्यक्रमाचा समाज बांधवांनी लाभ घेऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन संघटनेचे ता.अध्यक्ष परमेश्वर पांचाळ व उपाध्यक्ष राजेभाऊ पांचाळ



# वाळू माफियांचा महसूल पथकावर हल्ला अंधाधुंद दगडफेक

## मंडळ अधिकारी पी.डी.शिंदे यांना जब्बर मारहाण त्यांचा खांदा झालाय फ्रॅक्चर

प्रतिनिधी । घनसावंगी

घनसावंगी तालुक्याच्या हद्दीत मौजे दैठणा बुद्रुक शिवारात मंडळ अधिकारी श्री पी.डी.शिंदे यांच्या पथकाने रात्री गौण खनिज प्रतिबंधक कारवाई करत असताना त्यांनी हायवा पकडला त्याच वेळी वाळू माफियांनी पथकावर जोरदार हल्ला केला.व अंधाधुंद दगडफेक केली या हल्ल्यामध्ये मंडळ अधिकारी श्री पी.डी.शिंदे यांच्या डाव्या खांद्याच्या हाडाला दगड लागल्याने डावा खांदा फ्रॅक्चर झाला आहे.त्यांचा उपचार संजीवनी हॉस्पिटल अंबड येथे सुरु आहे.या पथकामध्ये श्री पी.डी.शिंदे मंडळ अधिकारी अंतरवाली टेंभी,श्री एन.पी.बाळापूरे मंडळ अधिकारी राणी उंचेगाव,श्री विजय बुचरे,श्री नारायण येवतीवाड,श्री तुषार दळवी,श्री अमोल बांडे,श्री संतोष सुपेकर,श्री भारत बारसे कर्मचारी होते. यात वाळू माफिया कडून अनेकदा महसूल



पथकावर हल्ले झालेले असून प्रशासनाने यांच्यावर कडक कार्यवाही करावी, जे वाळू माफिया दोषी असतील त्यांच्यावर कठोरातील कठोर शिक्षा करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांतून उपस्थित होत आहे

# शेतकऱ्यांसाठी दिवसा पूर्णवेळ वीज उपलब्ध करू: आमदार सुरेश धस

## बिबट्याच्या हल्ल्यात मृत झालेल्या महिलेच्या कुटुंबास मदत, जखमीवर उपचार करू

प्रतिनिधी । पाटोदा

पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी येथील शेतकरी महिलेचा बिबट्याने जिव घेतला. तर कारेगाव येथील येथील युवक बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाला आहे. यातील मयत सोजराबाई धोंडीराम बोबडे यांच्या कुटूंबास शासन तिन दिवसात पाच लाख रुपयाची राखे मदत करेल व विस लाख रुपये ठेव बचत करेल. अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी दिली असून शेतकऱ्यांना दिवसा पुर्णवेळ विद्युत पुरवठा शासन करेल. या संदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांना सुचना देणार आहे असेही ते म्हणाले.

गुरुवार (६ फेब्रुवारी) रोजी सायंकाळी आमदार सुरेश धस यांनी पाटोदा ग्रामीण रुग्णालयात जावून सोजराबाई धोंडीराम बोबडे यांच्या मृतदेहाची पाहणी केली. मेंगडेवाडी येथे जाऊन बोबडे कुटूंबीयांचे सांत्वन केले. दरम्यान त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला, ते म्हणाले की, वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी बोलणे झाले आहे. बिबट्याला मारण्याची थेट परवानगी नसली तरी देखील येत्या दोन ते तीन दिवसात या बिबट्याला जेरबंद

मेंगडेवाडी या ठिकाणी बिबट्याच्या हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या बोबडे कुटुंबीयांची भेट घेऊन आमदार सुरेश धस यांनी सांत्वन केले. पाटोदा ग्रामीण रुग्णालयात माध्यमांशी संवाद साधताना आमदार सुरेश धस.

करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा आम्ही उभी करणार आहोत. आष्टी या ठिकाणी काही पिंजरे देखील आहेत. यामधील तज्ञ लोकांशी बोलून बिबट्या नक्कीच दोन दिवसात जेरबंद होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सध्या सुगीचे दिवस आहेत व शेतीला पाणी देण्यासाठी देखील शेतकरी रात्री शेतात



जातात शेतकऱ्यांनी एकट्याने शेतात न जाता समूहाने जावे. त्याचप्रमाणे मोबाईल टॉर्च

व मोठ्या आवाजात गाणे लावून शेतात काम करावे. जेणेकरून बिबट्याचा वावर त्या ठिकाणी होणार नाही अशा पद्धतीने सर्वांनी काळजी घ्यावी. आपण स्वतः महावितरणच्या अधिकाऱ्यांशी लगेचच बोलणार असून शेतकऱ्यांना दिवसापूर्ण वेळ शेतीसाठी वीज उपलब्ध करून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न करू असे आमदार सुरेश धस यांनी यावेळी सांगितले.

# अवैधरित्या वाळू चोरी प्रकरणी १७ जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । शहागड

अंबड तालुक्यातील पाथरवाला बुद्रुक शिवारातील गोदावरी नदीपात्रातून बाबाची धडी या ठिकाणावरून केनी सहायाने अवैध वाळू उपसा करुन शंभर ब्रास वाळूचा अवैधरित्या साठा अवैधरित्या वाळूची चोरी करुन शासनाच्या महसूल बुडवला या कारणाने नायब तहसीलदार विवेक उढाण यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलीस ठाण्यात भरत घुमरे, ज्ञानेश्वर फुलारे,राहुल फुलारे,शरद घुमरे,पारस काटकर,महेश रुचके, पुनित भिसले, किशोर मगरे,प्रकाश ढवळे, विकास ढवळे,जगन विटोरे सतीश विटोरे,मुबीन शेख, सिध्दार्थ डेरे, गणेश फुलारे, सुनील मगरे रा.पाथरवाला बु.प्रल्हाद राक्षे रा.कुरण या १७ जणांवर गुन्हा दाखल झाल्याने वाळूमाफियांत खळबळ उडाली आहे.पहिल्यांदाच वाळू माफियांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे

# श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल येथे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । केज

दि.०७ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल येथे मोठ्या उत्साहात स्नेहसंमेलन झाले संपन्न झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.ह.भ.प.ईश्वरजी मुंडे सर हे होते तसेच या कार्यक्रमाचे उद्घाटक सुरेश तात्या पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,कानडी माळीचे सरपंच अशोक राऊत,साबला सरपंच सौ. जनाबाई काकडे,सरपंच विष्णू थोरात,माजी सरपंच दिनकर चाटे, होळ ग्रामपंचायत सदस्य हनुमंत घुगे,माजी सभापती नारायण बप्पा घुले,गोकुळ सारूक, सुदाम पालकर सर,माजी चेअरमन श्रीकांत घुले, अशोक चाळक,ज्येष्ठ पत्रकारधनंजय कुलकर्णी अशोक नागरगोजे,वसंत सोनवणे,मुब्बशीर खतीब यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी शैक्षणिक, सामाजिक,राजकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार बांधव बांधव तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना ईश्वर मुंडे यांनी गुरुकुल याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.पुढे बोलताना मुंडे म्हणाले की,श्रीराम प्रभु,लक्ष्मण, भरत,शत्रुघ्न यांनाही गुरुकुल मध्ये शिक्षण घेण्यासाठी त्या काळात पाठवले होते तसेच आताच्या आधुनिक काळात गुरुकुल विषयी शाळेतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना व्यसनापासून मुक्त व्हावे व व्यसनाच्या आहारी जाऊ नये याचे शिक्षण दिले पाहिजे व मोबाईलचा अतिवापर टाळला पाहिजे शाळेची शिक्षकाची व पालकाचे जबाबदारी आहे असे मत प्रा.ईश्वर मुंडे सर यांनी व्यक्त केले आहे.यावेळी विद्यार्थी व उपस्थित पालकांना हनुमंत भोसले सर यांनी मोलाचा सल्ला दिला आहे.यावेळीसाबला येथील सरपंच सौ.जनाबाई काकडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या.तर सुरेश तात्या पाटील यांनीही श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुलचे संस्थापक सचिव दादासाहेब कराड यांना या संस्थेचे रूपांतर वट वृक्षात




व्हावे अशा शुभेच्छा दिल्या व सदैव आम्ही आपल्या सोबत आहोत अशा शुभेच्छा देऊन लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्या साठी थोडक्यात मनोगत व्यक्त करून मान्यवरांनी छोट्या चिमुकल्या मुलांचे कौतुक पाहण्यासाठी मान्यवरांनी बक्षीस रूपात त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले.यावेळी संत ज्ञानेश्वर गुरुकुल संस्थेचे सर्व कर्मचारी वृंद विद्यार्थी पालक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.